# चैतन्य लहरी

सप्टेंबर-ऑक्टोबर २००४ अंक क्र. ९,१०



# श्री गणेश पूजा २००४








# अनुक्रमणिका


- ..... निर्विघ्नं कुरु मे देव ---------- २
- श्रीकृष्ण पूजा वृत्तांत, न्यूयॉर्क, सप्टेंबर २००४ ---------- ३
- समर्पण आणि शरणागति, श्रीमाताजींचे प्रवचन, ऑगस्ट १९८३ ---------- ४
- कुण्डलिनी योग- ज्ञानेश्वरी अध्याय ६ वा ---------- ७
- ध्यान, प.पू.श्रीमाताजींचा उपदेश.१९८२/८३ ---------- १०
- आईचा जोगवा ---------- ११
- वैष्णोदेवी ---------- १५
- दिवाळी पूजा,श्रीमाताजींचे भाषण ११ ऑक्टोबर ८९ ---------- १८
- वनदेवी आयर्वेदि हेल्थ प्रॉडक्टस प्रा.लिमीटेड ---------- २०

॥ जय श्रीमाताजी ॥

चैतन्य लहरीच्या सर्व सभासदांना ही दीपावली सुखसमृध्दीची आणि भरभराटीची जावो. सर्वांना पुढील काळात सहजाची ध्यानधारणेमधिल गहनता श्री माताजींच्या कृपेत मिळो. तसेच सर्वांकडून प.पू.श्रीमाताजींना अपेक्षित असणारे सहजयोगाचे कार्य घडो. आपल्या सर्वांमधील आत्मप्रकाश सर्वत्र उजळू दे.

# ..... निर्विघ्नं कुरु मे देव

आलिकडेच गणेशोत्सव व पाठोपाठ आलेला नवरात्रोत्सव पारंपारिक उल्हास व उत्सवपूर्ण वातावरणात पार पडला. त्यांच्या साथीला निवडणूक जल्लोषहही होता. या उत्सवकालांत एकूण मानवी समाजाला सत्य आणि विवेकाची आज किती जरूर आहे याची प्रकर्षाने जाणीव होते व त्याचबरोबर मानव समाजाला उन्नत स्थितीवर येण्यास अजून किती काळ लागणार आहे याचीही चुटपुट मनांत डोकावते. अर्थात मनुष्यप्राण्याची ही दीर्घ भविष्यकालीन स्थिति आपल्या तोकड्या मन:शक्तीच्या आवाक्यांत नाहीं व ते उज्ज्वल भवितव्य श्रीमाताजींची दिव्य दृष्टीच पाहूं शकते.

त्यामुळेच सहजयोगी म्हणून स्व:तची आधिकाधिक प्रगल्भता व तेज प्राप्त करण्याचा सातत्यानें प्रयत्न करत राहणें आणि त्याचबरोबर सहजयोग प्रचार व प्रसार कार्याचा अधिकाधिक ध्यास बाळगणें हेच आपले प्राथमिक कार्य व जबाबदारी आहे असे म्हटल्यास वागवे ठरूं नये. तसे करत राहिलो तरच मानवजातीचा तरणोपाय आहे व त्यासाठींच आपली निवड झाली आहे हे विसरून चालणार नाहीं. परमचैतन्याच्या कार्याचे आपण फक्त उपकरण आहोत हे मानल्यावर उपकरण म्हणून आपण उत्तरोत्तर अधिक सक्षम व कार्यप्रवीण कसे बनूं याचे भान आपण सदैवजागृत राखले पाहिजे. श्रीमाताजींचे सर्व आशीर्वाद आपल्या पाठी त्यासाठीच आहेत.

एवढ्यासाठींच आपण श्रीगणेशांची आराधना करूं या. विवेक, सूज्ञता, पराक्रम व आईलाच सर्वस्व मानणें या त्यांच्या अलौकिक गुणांचे श्रीमाताजींनी अनेकदां वर्णन केले आहे व श्रीगणेशांना आपल्यामधें जागृत व प्रस्थापित करण्याचा उपदेश आपणा सर्वांना केला आहे. आपणही स्वत:च्या व इतरांच्या आत्मोन्नतीसाठीं "निर्विघ्नं कुरु मे देव " अशी प्रार्थना त्या विघ्न हर्त्याच्या चरणीं करूं या.

• • •

# श्रीकृष्ण पूजा : वृत्तांत

न्यूयॉर्क ; अमेरिका :

सप्टेंबर २००४




श्रीकृष्ण -पूजा सोहळा लॉस-एन्जेलिस, अमेरिका इथे ३ ते ५ सप्टेंबर २००४ या तीन दिवसांत संपन्न झाला. साधारण ६००-६५० सहजयोगी जमले होते; त्यांत मुख्यकरुन अमेरिका व कॅनडामधील होते व तसेच स्विट्झरलँड, फ्रान्स, युरोप अशा देशांमधूनही योगी आले होते.

पहिले दोन दिवस सर्व सहजयोग्यांनी संगीत व सांस्कृतिक कार्यक्रमाचा आनंद मिळवला. त्यामधील विशेष कार्यक्रम म्हणजे प.पू.श्रीमाताजींच्या 'निर्मला' या दिव्य नांवाचा अर्थ स्पष्ट करून दाखवणारा एक विशेष कार्यक्रम सादर झाला; सोबत श्रीमाताजींचे त्या संदर्भातील कांही खास फोटो दाखवले गेले व 'निर्मला 'या शब्दाचा, पूर्वी श्रीमाताजींनीच स्पष्ट केलेला अर्थ सविस्तरपणें विशद केला गेला. या सर्व सादरीकरणाची CD बनवली आहे. व ती इतरत्र उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली जाणार आहे. त्याच कार्यक्रमात श्रीमाताजींनी ४० जेष्ठ योग्यांचे एक WORLD COUNCIL स्थापित केल्याची माहिती दिली गेली. त्याचबरोबर श्रीमाताजींनी त्यांचे कबेला येथील निवास-स्थान व पूजा-कार्यक्रमाचा हँगर विश्व-निर्मल धर्म संस्थेला अर्पण केल्याचे जाहीर करण्यांत आले.

तिसऱ्या दिवशी ता ५ ला. प्रथम सहजयोगी-योगिनींनी रक्षाबंधनाचा समारंभ केला. रात्री पूजेसाठी प.पू.श्रीमाताजींच्या चरणी लहान मुलांनी गणेश-पूजा अर्पण केली. पूजेनंतर श्रीमाताजी कांहीच बोलल्या नाहींत वा प्रवचन झाले नाहीं. उपस्थित योगीजनांना त्यांच्या दिव्य दर्शनातूनच तेजस्वी चैतन्याची व त्याद्वारे मिळणाऱ्या अपूर्व प्रेम, करुणा, शक्ति व संरक्षणाची अनुभूति व जाणीव झाली. आदिशक्तीच्या तेजस्वी दर्शनामुळे व कृपाकटाक्षामुळे सर्वजण भारावून गेले आणि तृप्त झाले. श्रीमाताजींनी सर्वांना अनंत आशीर्वाद दिले.

• • •



# समर्पण आणि शरणागति

प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे प्रवचन (संक्षिप्त)
लंडन, ६ ऑगस्ट १९८२

स्वत:कडे कठोरपणें पाहून आत्मपरिक्षण करणें ही शरणागति; सहजयोगाच्या तत्त्वांबद्दल सर्वार्थानें व सर्वांगाने एकनिष्ठ होणे हेच समर्पण.

आज मी तुम्हाला समर्पण आणि शरणागति यांचे महत्त्व समजावून सांगणार आहे.

आपण एखाद्या मोठ्या पर्वताच्या अगदीं सान्निध्यात येतो तेव्हा त्याचा प्रचंड आकार व विशालता आपल्या लक्षांत येत नाहीं. ही एक प्रकारची माया आहे. सहजयोगातही असेच होते. सहजयोग घेतल्यावर लोकांना आपल्याला काय मिळाले आहे, आत्मसाक्षात्कार म्हणजे काय, त्याची महति काय, आपण त्यासाठीं कां निवडलो गेलो, त्याचा उद्देश काय, आतां आपल्याला काय मिळवायचे आहे, आपण किती गहनता मिळवली आहे इ. अनेक गोष्टी समजत नाहींत व जाणीवेच्या कक्षामधें उतरत नाहींत; मतिगुंग झाल्यासारखी अवस्था येते. थोडक्यांत आत्मसाक्षात्कार झाला म्हणजे काय झाले हेच नीट लक्षांत येत नाहीं.

हे समजण्यासाठींच समर्पण व शरणागति समजून घ्यायला हवी.

आता साधा विचार करा; आपल्याला आत्मसाक्षात्कार याच आयुष्यात मिळणार आहे असे कुणी आधीं सांगितले असते तर तुम्ही ते मान्य केले असते कां? हां, तुम्ही साधक असाल, कांहीं ना कांहीं साधना करत असाल; पण तरीही त्याची फलप्राप्ती म्हणून आत्मसाक्षात्कार मिळेल असं तुमच्या मनांतही आले नसेल. आणि असेही असेल की जागृति मिळाल्यावरही काय झाले हे तुम्हाला जाणवले नसेल. समुद्रात फेकले गेल्यावर त्याचा विस्तार किती आहे हे जसे समजत नाहीं तसे हे आहे. समुद्राच्या आंतमधे आपण किती खोलवर आलो आहोत, आयुष्यांत आपल्याला काय मिळवायचे आहे हे समजले पाहिजे. त्यांत भर म्हणून आपण निर्विचारतेत आलेले असतो. तेव्हा तार्किक बुध्दि वापरून ह्यांची उत्तरे मिळत नसतात.

हा अफाट अनुभव, आदिशक्तीचे अवतरण व आत्मसाक्षात्काची अलौकिक देणगी हे सर्व विचारांमधून समजणें अशक्य आहे. तुम्हाला जे मिळाले आहे त्याचे बुध्दीनें मोज-माप करणें अशक्य आहे. कारण तार्किक बुध्दी वापरून तुम्हाला मिळालेला नवीन आयाम तुमच्या लक्षांतच येणार नाहीं. जे झाले ते बुध्दीच्या पलिकडचे आहे; आतां ही तार्किक बुध्दीच लयास गेली आहे; इतकी की जे झाले आहे त्याचे वर्णन करणेही तिला शक्य नाहीं.

आतां तुमचे फक्त एकच काम उरले आहे आणि ते म्हणजे तुम्ही एक थेंब म्हणून ज्या समुद्रात उतरलात त्या समुद्रात पूर्णपणे मिसळून स्वत:च समुद्र बनणें. त्यातूनच तुमच्यासारखे अनेक थेंब एकमेकांत समरस होतील आणि मग सर्वांनाच आपण सर्व मिळून समुद्र आहोंत हे समजेल.

म्हणून आता सर्वप्रथम तुम्ही पूर्णपणें शराणागत भक्त बनले पाहिजे. हे फार महत्त्वाचे आहे; या अवतरण काळांत तर ते फारच आवश्यक आहे

कारण तुम्ही आतां साक्षात्कारी लोक आहांत. आधीं तुम्ही कोण होता, काय-काय चुका केल्या ते सर्व विसरून जा. आईने सर्वांना क्षमा केली आहे असं समजा.

मी क्षमा करते कारण तो माझा स्वभावच आहे. पण तुम्ही ते गृहीत धरून बसूं नका. खरें तर तसे करण्यांत तुमचेंच नुकसान आहे. चुका करून वर माझी क्षमा मागायची याला कांहीं अर्थ नाहीं. पण मी क्षमा केल्यानें तुम्हाला काय मिळणार? उलट तुमचे नुकसानच होणार. हे जर तुम्ही विचार करून नीट समजून घेतले तरच शरणागति म्हणजे काय हे तुमच्या लक्षांत येईल.

सहजमधील शरणागति म्हणजे सहजयोगांत ज्या गोष्टी सांगितल्या जातात वा तुम्हाला आढळतात त्याचा मनाने विचार करण्यांत अर्थ नाहीं; कारण त्या मानवी मानसिकतेच्या पलीकडच्या आहेत. म्हणून मानवी मानसिकतेमधून त्याचा विचार करूं नका किंवा वैयक्तिक रीत्या त्याची वाच्यात करूं नका. वाटल्यास सामूहिक स्तरावर त्याच्याबद्दल बोला. सामूहिक स्तरावर तुमचे संबंध माझ्याबरोबर चांगले प्रस्थापित होतील. कारण सामूहिक स्तरावर तुमचे एकमेकांबद्दलचे संबंध दृढ झालेले असतात. वर समुद्रांत आलेल्या नवीन थेंबाचे उदाहरण दिले त्याचाही अर्थ हाच होता की प्रत्येक थेंब स्वतःचे अस्तित्व विसरुन इतर सर्व थेंबांबरोबर एकरूप झालेला असतो आणि अशा एकरूप झालेल्या थेंबांचाच शेवटीं समुद्र बनत असतो.

म्हणजे शरणागतीला दोन धारा आहेत, एक एकमेकांबद्दल आणि दुसरे म्हणजे तुमच्या आईबद्दल. सहजयोगामधें मला जे दिसते ते तुमच्या दृष्टिपथांत येणें शक्य नाहीं. हे तुम्ही मानता का? माझ्या दृष्टिक्षेपांत फार दूरचेही येते, तुम्हाला ती दृष्टि नाही हे लक्षांत घ्या. म्हणून माझ्याबरोबर जो क्लृप्त्या करतो त्याचे कांहीं ठीक नाहीं, -माताजी क्षमा करतील-हे गृहीत धरून जो चुकीच्या गोष्टी करतो तो स्वतःचेच नुकसान करून घेत असतो.

कांहीं लोक - माझे हे चक्र खराब आहे, माझ्यात अमक्याचे भूत आले आहे- अशा प्रकारची भाषा करतात; कांहीं जण दुसऱ्याला दोष देत बसतात. ह्या गोष्टींना अर्थ नाहीं; ही तुमची स्वतःचीच मानसिकता आहे. म्हणजे तुम्ही स्वतःलाच नीट पहात नाहीं असं म्हटले पाहिजे. माझ्या बद्दलची शरणागति म्हणजे स्वतःच स्वतःकडे कठोरपणें पाहणें. त्यातूनच आपण करतो ते योग्य का अयोग्य हे तुम्हाला समजेल. नाही तर तुम्ही स्वतःचेच वैरी व्हाल. तुमची आई प्रेमाचा सागर आहे. भुतांना तुम्हीच तुमच्यामधें प्रवेश करण्याची मोकळीक देता; तुम्ही अध्यात्मिक पातळीवर खंबीर असाल तर तुमच्यामधें भुते शिरूंच शकणार नाहींत. याच्यातून सुटका करून घेण्याचा एकमेव मार्ग म्हणजे समर्पण.

तुम्ही जेव्हा 'माताजींवर माझी श्रध्दा आहे' असे म्हणता तेव्हा तुम्ही, दुसरे सर्व मार्ग संपले, अशी दृढ भावना बाळगून राहिलात तर तुमच्या श्रध्देमधें जोर येईल व दुसरा कसला किन्तु मनांत येणार नाहीं. तसे झाले म्हणजे तुम्हीच म्हणाल की 'माझ्याच चुकांमुळे हे झाले; म्हणून मलाच सहजयोगाबरोबर पूर्णपणें सर्वांगाने एकनिष्ठ झाले पाहिजे.'

सहजयोगी म्हणून तुम्ही एका उच्च स्तरावर आलेले व्यक्ति आहांत. तुम्हाला साक्षात्कार मिळाला ही तुमच्या उन्नति-मार्गावरील पहिली झेप; आतां दुसरी झेप मारण्याचे बळ मिळण्यासाठीं तुम्हीं शरणागत झाले पाहिजे. सहजयोगालाच पूर्णपणें प्राधान्य, बाकी सर्व गोष्टी गौण झाल्या पाहिजेत. अशा तऱ्हेनें समर्पणातून तुम्ही एक दिव्य व्यक्ति बनता. म्हणून ते मिळवण्याचा ध्यास घेतला पाहिजे. समर्पण जसजसे वाढेल तसतसे शरणागति आपोआप बळकट होत जाईल. तर्क-वितर्क करण्याची प्रवृत्ति या प्रगतीच्या आड येत असते; त्यामुळें तुम्ही भ्रमांत पडता आणि आपण व्यतीत करत असलेले जीवन पूर्णपणें ऐहिक व जड आहे हे समजण्यांत अडथळे येतात. ही संवय सुटली पाहिजे; त्यासाठीं वाद घालणें, समर्थन करणें यासारख्या गोष्टी सोडून द्या. त्यांच्या फंदात पडूंच नका. आता तुम्ही उमलून सुंदर सुवासिक फूल बनले पाहिजे. बागेतून चालत असतांना झाडाच्या फांदीचे टोक वा काटासुध्दां पदराला अडकला की सबंध

साडी खेचली जाते. तसे हे दोष तुमच्या प्रगति-मार्गावरून तुम्हाला खेचत राहतात. म्हणून स्वत:च स्वत:चे समर्थन करण्यापेक्षां 'स्व' आहांत तसे 'स्व' बना.

आणखी एक गोष्ट; तुम्हाला आतां अंतिम सत्य समजले आहे. म्हणून तुम्ही सत्याबरोबर ठामपणें उभे राहिले पाहिजे. मी जे बोलते त्याबद्दल मला पूर्ण खात्री व आत्मविश्वास असतो; त्यासाठी मी कुणाशी चर्चा करत नाहीं किंवा पुस्तक वाचत नाहीं, त्याची मला जरूरच नाहीं. कारण मला ते 'सत्य' म्हणून माहित असतेच व तेच माझ्या तोंडून येते. तुम्हीसुध्दां ती स्थिति मिळवली पाहिजे. त्यासाठीं तुम्ही समजून घेतले पाहिजे कीं साक्षात्कार मिळाल्यानंतर आणि जाणीवेच्या उच्च आयाम सापडल्यानंतर तुम्ही आतां परमेश्वरी कार्याचे उपकरण बनले आहांत. हे ठामपणें मनांत बिंबवून घ्या. 'मी साक्षात्कारी व्यक्ति आहे' हे न कचरतां स्पष्टपणें सांगा.

त्यासाठींच वर सांगितल्याप्रमाणें स्वत:कडे सतत पहात राहून स्वत:ला अधिकाधिक शुध्द बनवा; म्हणूनच माताजी, सहजयोग, सत्य याबद्दल समर्पण पाहिजे. हीच तर शक्ति आहे; येशू ख्रिस्त, मोहम्मदसाहेब यांच्या सारख्यांजवळ ती शक्ति होती आणि त्याचा पाठपुरावा करण्याची सर्व ताकद होती. समर्पणातूनच ही निर्भय होण्याची शक्ति मिळणार आहे. असे समर्पण असले की मग तुम्हाला कुणाचीही, कशाचीही भीति वाटणार नाहीं; तसेच तुमच्या नुकसानीचीही पर्वा वाटणार नाहीं; कारण तुम्ही सत्याबरोबर राहतां; अर्थात सत्याचा नव्हे तर असत्याचाच त्याग करता. आता तुम्ही निर्भय, धीरोदात्त, तेजस्वी सहजयोगी बनणारे आहांत. समर्पण हे वातीच्या दिव्यातील तेलाप्रमाणें आहे, तेल आहे तर दिवा व त्याचा प्रकाश आहे. समर्पित होणे म्हणजे कोबीच्या गड्ड्याप्रमाणें जड बनणे नव्हे तर क्रियाशील बनणें; हे कार्य अपायकरक नसून पूर्णपणें कल्याणकारक, विधायक होत रहाते.

याबरोबरच, ही शक्ति मिळत असतांनाच तुमच्यामधील करुणाही अधिकाधिक बळावते. सत्य व करुणा एकत्रच असतात. तेल आणि वात एकत्र असल्याशिवाय दिवा नाहीं आणि प्रकाशही नाहीं असे हे असते. दुसऱ्याबद्दल तुमच्याजवळ करुणा नसेल तर माझी क्षमा व करुणेची अपेक्षा ठेवता येणार नाहीं. मी जे प्रेम व करुणेमधून तुमची काळजी घेते तेच प्रेम व करुणा इतरांना वाटलेत तरच तुमची वाढ होणार आहे. नाहीं तर त्याचा काय उपयोग? सहजयोग्यांनी एकमेकांना सांभाळून घेतले पाहिजे, आधार दिला पाहिजे; टीका न करता प्रेमातूनच व्यवहार करा. करूणेचा हा झरा वाहता ठेवला नाहीं तर आटून जाईल. ही भावना स्वाभाविकपणें, हृदयातून आल्यासारखी प्रगट झाली पाहिजे; त्याच्यामधें कृत्रिमपणा, दिखाऊपणा वा मतलब नसावा. स्वत:चे सुख-आराम बघण्याआधी इतरांना ते मिळेल अशी काळजी घ्या. हे प्रेम व करुणा इतरांपर्यंत पोचवलीत की समर्पण पूर्ण झाले. सर्व सहजयोग्यांचे एकच कुटुंब आहे, ह्यालाच सामूहिकता म्हणतात. जे आहे ते सर्वांसाठी आहे व सर्वांनी वाटून घेतले पाहिजे. सहज-विवाहांत उतरणाऱ्या तरुण योगी-योगिनींनीं ह्याला जास्त महत्त्व दिले पाहिजे.

सहजयोगाचे एक वैशिष्टय म्हणजे सहजयोगांत तुमची वृक्षासारखी वाढ होते. एवढेच नाही तर त्याचा मूल स्त्रोतही तुमच्यामधे उतरलेला असतो. त्यामुळें तुम्ही कुठेही असला किंवा तुमचे राहण्याचे स्थान (गांव) बदलले तरी त्या स्त्रोतापासून इतरांचे पोषण होणारच असते आणि त्यातून नवे वृक्ष तयार होणार आहेत. म्हणून त्या बाबतीत निश्चिंत असा. कुठल्याही एका गोष्टीला वा तत्त्वाला वा व्यक्तिला चिकटून राहणे सोडा व निरासक्त व्हा. कसलीही आसक्ति प्रगतीच्या आड येत असते हे विसरू नका. परमेश्वराच्या राज्यांत आल्यावर त्याचे कार्य करणें हीच तुमची सेवा करणें आहे. आतां तुम्ही सागरांत उतरला आहांत हे जे वर सांगितले त्याचा अर्थ नीट लक्षांत घ्या.

मी हे जे सर्व सांगितले ते त्याचा उद्देश एवढाच आहे की तुम्ही अधिकाधिक व्हायब्रेशन्स खेचून घ्या आणि तो प्रसाद इतरांना वाटा. हे केवळ तर्कप्रणालीसारखे विचार नाहींत तर ते तुमच्या आंतमधें घटित होणारे आहे. म्हणून त्याचा स्वीकार करा.

सर्वांना अनंत आशीर्वाद. ● ● ●

# कुण्डलिनी योग - ज्ञानेश्वरी अध्याय ६ वा



(अंक क्रमांक ७/८ - २००४ पुढे)

(कुण्डलिनीने सहस्रार-भेदन केल्यावर शक्ति आणि परमात्मा यांचे ऐक्य होते ही आनंद-चैतन्य स्थिति सांगत ज्ञानदेव पुढें म्हणतात)

.... जें महाभूतांचे बीज । जे महातेजाचे तेज ।
एवं पार्था जे निज । रूप माझे ॥ ३२३ ॥
.... परब्रह्माचेनि रसे । देहाकृतीचिये मुसे ।
वोतीव जाहले तैसे । दिसती आंगे ॥ ३२७ ॥

जे पंचमहाभूतांचे बीज आहे, जें सूर्याचे तेज आहे, त्याप्रमाणें अर्जुना, हे माझेंच खास स्वरूप आहे (तीच ही आकाराला आलेली चतुर्भुज मूर्ति होय. या योगाभ्यासानें शुध्द झाल्यावर योगी आमच्या बरोबरीला आले) असा योगी देहाकृतीच्या मुशीत प्रब्रह्मरस ओतून तयार केलेली मूर्तिच असे शरीरानें दिसतात.

(तरीही पूर्ण शंका-निरसन न झाल्यामुळें अर्जुन कांहीं प्रश्न करतो व भगवान स्पष्ट करतात.)

.... आतां कृष्णा तुवां सांगितला योगु । तो मना तरी आला चांगु ।
परी न शके करूं पांगु । योग्यतेचा ॥३३३ ॥

..... वा सहजें आंगिक जेतुली आहे । तेतुलियाची जरी सिध्दि जाये ।
तरी हाचि मार्गु सुखापाये । अभ्यासीन ॥ ३३४ ॥
..... हां हो जी अवधारिले । हे जे साधन तुम्ही निसपिले ।
आवडतयाहि अभ्यासिले । फावों शके ॥ ३३७ ॥
....... नावेक विरक्तु । जाहला देहधर्मी नियतु ।
तरी तोचि नव्हे व्यवस्थितु । अधिकारिया ॥ ३४२ ॥
..... ते हे ऐसी व्यवस्था । अनियतासि सर्वथा । योग्यता नाहीं ॥ ३४४ ॥
...... म्हणोनि अतियशें विषयसेवा । तैसा विरोध न व्हावा ।
कां सर्वथा निरोधु करावा । हेहिं नको ॥ ३४८ ॥

(कृष्णानें सांगितलेला योग ऐकून अर्जुन म्हणतो ) कृष्णा, तूं सांगितलेला योग माझ्या मनाला चांगलाच पटला; परंतु माझ्या ठिकाणीं अधिकाराची उणीव असल्यामुळें मी त्याप्रमाणें करूं शकत नाहीं. माझ्या अंगात स्वभावात: जेवढी योग्यता आहे तेवढीच जर पुरेशी असेल तर मी या मार्गाचा सुखानें अभ्यास करीन......(पण)तुम्ही हे जे साधन सांगितले त्याचे कुणी वाटेल त्याने अनुष्ठान केले तर ते सिध्दीस जाईल कां? ....(कृष्ण स्पष्ट करताना सांगतात) थोडासा विरक्त असून देहाच्या गरजा ज्यानें आवरल्या आहेत तोच यासाठी योग्य अधिकारी नाहीं काय? जो नेहमींच अनियमितपणें वागतो त्यास मुळींच योग्यता नाहीं. म्हणून विषयांचे अतिसेवन करावे अशी बुधि नसावी किंवा वाजवीपेक्षां फाजील नियमन करणें हेहि योग्य नाहीं.

(यथा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते - नियमन केलेले चित्त आत्म्याच्या ठिकाणी लय पावते- या मूळ गीतेमधील वचनाचा अर्थ स्पष्ट करतांना ज्ञानदेव पुढें सांगतात)

..... तें दीपाचे उपलक्षण । निर्वातींचिया ॥ ३५८ ॥
..... पाहें पा आयुष्याचा अढळ करी । जे सरते जीवित वारी ।
तया औषधातें वैरी । काय जिव्हा न म्हणे ॥ ३६२ ॥
..... एऱ्हवी तरी येणें योगे । जैं इंद्रिया विंदाण लागे ।
तैं चित्त भेटों रिगे । आपणपेया ॥ ३६५ ॥
..... परतोनि पाठमोरे ठाके । आणि आपणियाते आपण देखे ।
देखतखेंवो वोळखे । म्हणे तत्त्व ते मी ॥ ३६६ ॥
..... तिये ओळखीचिसारिसे । सुखाचिया साम्राज्यीं बैसे ।
चितपण समरसे विरोनि जाय ॥ ३६७ ॥

(अशा योग्य पुरुषाच्या मनाच्या स्थितीला ) निर्वात स्थळींच्या दिव्याची उपमा योग्य होईल....

आयुष्याला स्थिर करणारे व संपत आलेल्या जीविताला मार्गे आणणाऱ्या औषधाला जिव्हाही शत्रू म्हणत नाहीं का?.....या योगामुळें ज्या वेळेला इंद्रियांचा विग्रह होतो त्यावेळेला चित्त आपल्या (चैतन्याच्या)भेटीला निघते. ते ज्या वेळेस विषयांना सोडून परत अंतर्मुख होते व आपण आपल्यालाच पाहते तेव्हां त्यास स्व-स्वरूपाची ओळख पटते आणि ते तत्त्व मीच आहे अशा समजुतीवर ते येते. त्या ओळखीबरोबरच ते सुखाच्या साम्राज्यावर बसते आणि तेथें आत्म्यासी समरस झाल्याने चिताचा चित्तपणाच नाहींसा होतो आणि देहाचा विसर पडतो.

(अशा स्थिर चिताबद्दल ज्ञानदेव पुढे म्हणतात )

..... चित्त महासुखीं पहुडलिया । चेवोचि नये ॥ ३७८ ॥
..... ऐसे आपणपां रिगोनि ठाये । मग देहाची वासना पाहे ।
आणिकचि सुख होऊन जाये । म्हणून विसरे ॥३७१ ॥
..... ऐसे वैराग्य हें करी । तरी संकल्पाची सरे वारी ।
सुखे ध्रुतीचिया धवळारीं । बुध्दि नांदे ॥ ३७७ ॥
..... तैसे चित्त लया जाये । आणि चैतन्यची आघवे होये ।
ऐसी प्राप्ति सुखोपाये । आहे येणें ॥ ३८६ ॥

चित्त निरतिशय सुखांत लीन झाल्यामुळें परत वृत्तीवर येत नाहीं. याप्रमाणें चित्त आपल्या ठिकाणीं येऊन राहिल्यावर मग देहतादात्म्य घेत नाहीं व अलैकिक सुखच बनल्यामुळें ते चित्त देहाला विसरते. (मनाची सतत इंद्रियांच्या मार्गे बाहेर धावण्याची प्रवृत्ति आवरून )वैराग्य बाळगून हे केले तर संकल्पाची येरझार (संकल्प-विकल्प ) संपते आणि बुध्दि धैर्याच्या महालांत सुखानें वास करतें. याप्रमाणें चित्त आत्मस्वरूपी लीन झाल्यावर (लयाला गेल्यावर)संपूर्ण विश्व चैतन्यमयच होते. (द्वैत मावळून अद्वैत प्रकाशित होते. हाच अद्वैत - भाव आणखी स्पष्ट करण्यासाठीं ज्ञानदेव पुढें सांगतात)

..... दीपा आणि प्रकाशा । एकवंकीचा पाडू जैसा ।
.... जैसे उदकाचेनि आयुष्य रसु । कां गगनाचेनि माने अवकाशु ॥ ३९६-९७ ॥
.... जेणें ऐक्याचिये दिठी । सर्वत्र मातेचि किरीटी ।
देखिला जैसा पटीं । तंतु एक ॥ ३९८ ॥

दिवा आणि त्याचा प्रकाश हे दोन्ही जसे एकच, जेथपर्यंत पाणी तेथपर्यंत ओलावा, आकाशाबरोबरच पोकळी, वस्त्रामधें एकच सूत अशा ऐक्य भावनेने (मला पाहतो तो देहधारी असूनही देहाचे तादात्म्य घेत नाही)

....पुढील अंकी चालू

# ध्यान

## प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचा उपदेश

ऑस्ट्रेलियामधें सिडनी येथें प.पू.श्रीमाताजींनी ध्यानासंबंधी १४ मार्च १९८३ रोजी सहजयोग्यांना मार्गदर्शन केले होते. त्या प्रवचनामधील कांही महत्त्वाची अवतरणे :

.....जीवनामधील शांति, सुंदरता आणि प्रतिष्ठेचा स्रोत आपल्यामधेंच आहे हे आतां तुम्हाला समजले आहे. ध्यानामधें अधिकाधिक प्रगल्भता मिळवण्यासाठीं ध्यानामधूनच त्या अंत:स्रोतापर्यंत तुम्ही पोचूं शकता. हा परमानंदाचा सागर तुमच्यामधेंच आहे म्हणून तो तुम्ही स्वत:च शोधला पाहिजे व तेथपर्यंत पोचले पाहिजे. तो प्रयत्न करणें म्हणजेच ध्यानामधें खोलवर उतरणे.

.....कधीं कधीं वाऱ्याचा झोत इतका प्रखर असतो की आंतमधील दैवी शक्तीचा तुम्हाला विसर पडतो व तिकडचे लक्ष विचलित होते. अशा वेळींही आंतमधें वळण्याचे भान राखा; क्षणोक्षणी आपल्याला आंत उतरायचे आहे हे स्वत:ला बजावत रहा. जसजसे आंत उतरत जाल तसतसे बाहेरील ऐश्वर्याचे भान कमी- कमी होत जाईल.

.....पैसा, सत्ता, अधिकार, नातलग या विषयांना चिकटून राहण्याची संवय सोडून निरासक्तपणें त्यांच्याबरोबर सहजयोग्यांनी राहिले पाहिजे. त्यातून आसक्तीबद्दलची भ्रांति तुमच्या लक्षांत येईल. सहजयोग हृदयातून फुलला पाहिजे; हृदय त्यांत ओंतल्याशिवाय त्याची महति समजणार नाहीं.

..... ध्यानामधें परमात्म्याला जाणणें हा प्रत्येकाचा स्वत:चाच प्रयत्न असतो. एकदां तिथपर्यंत पोचलात की मगच तुम्ही कलेक्टिव्ह होता. तोपर्यंत प्रयत्न करत राहणें ही मात्र वैयक्तिक साधना आहे.

.याच विषयावर श्रीमाताजींनी लंडन येथील आश्रमांत ऑगस्ट १९८२ मधें केलेल्या मार्गदर्शनामधील कांही अवतरणें :

...तुमचे चित्त प्रकाशित झालेले आहे, तेव्हां स्वत:कडेच पहात चला, आत्मस्वरूप असल्याची पुन्हां-पुन्हां स्वत:ला आठवण करून घ्या. अहंकार व प्रति-अहंकार यांच्याकडेही या प्रकाशित चित्तामधून लक्ष ठेवा. कारण हेच मुख्य अडथळे आहेत. अहंकार तुम्हाला मूर्ख बनवतो तर प्रति-अहंकार भित्रा बनवतो. प्रकाशित चित्तामधून त्यांचे खेळ लक्षांत घ्या. हम-क्षम हा मंत्र त्यासाठीं चांगला.

.....म्हणूनच चित्त कुठे धांवत आहे हे सतत जाणले पाहिजे. हा एक अभ्यास आहे. हा अभ्यास सतत जाणीवपूर्वक केल्यास साक्षीभाव वृध्दिंगत होत राहतो. त्यांतून तुम्ही खऱ्या अर्थानें शांत व्हाल. त्यांतूनच तुम्हाला नवीन प्रेरणा येत राहतील.

.....आपले चित्त एखाद्या ध्वनिमुद्रण यंत्रासारखे किंवा कॅमेऱ्यासारखे काम करत असते. या दोन्ही उपकरणांचा वापर होत असताना मधें-मधे येणारे आवाज किंवा प्रतिमा-हालचाल यांच्यामुळे मुद्रण किंवा फोटोवर परिणाम होतो हे तुम्ही जाणता. त्याचप्रमाणें चित्ताचे काम चालते. अभ्यासामधून तुम्ही चित्तावर नियंत्रण मिळवले की जे पाहता-ऐकता त्या वस्तूचा वा घटनेचा खोल अर्थ तुम्हाला स्पष्ट होतो; मग केवळ प्रतिक्रियात्मक वा तुलनात्मक विचार येत नाहींत; उलट तुमची जाणीव प्रत्येक गोष्टींमधील सौंदर्य ग्रहण करते.

.....म्हणूनच प्रत्येक वेळी दुसऱ्याचे दोष व चुका दाखवणें, प्रत्येक गोष्टीबद्दल मत-प्रदर्शन करणें, आवड-निवड जपणें इ. गोष्टी टाळून दुसऱ्या व्यक्ती-घटनेमधील चांगुलपणा लक्षांत घेत राहणे चांगले. ●●●

# आईचा जोगवा

अनादि निर्गुणी प्रगटली भवानी
उदे बाई, उदे बाई, उदे बाई, उदे
मोहमहिषासुर मर्दाना लागुनि
उदे बाई, उदे बाई, उदे बाई उदे

त्रिविध तापांची करावया झाडणी
उदे बाई, उदे बाई, उदे बाई, उदे
भक्ता लागुनी पावसी निर्वाणी
उदे बाई, उदे बाई, उदे बाई, उदे ......भक्ता लागुनी ..... जोगवा ....... ॥१॥

द्वैत सारुनी माळ मी घालीन
हाति बोधाचा झेंडा मी घेईन
भेद रहित ग वारिसी जाईन ..... भेदरहित ग.... जोगवा..... ॥२॥

नवविध भक्तीच्या करूनि नवरात्रा
करूनि निराकरण मागेन ज्ञानपुत्रा
दंभ संसार सोडीन कुपुत्रा. ......दंभ संसार ग......जोगवा....... ॥३॥

पूर्ण बोधाची भरीन मी परडी
आशा मनिषांच्या पाडीन मी दरडी
मनोविकारा करीन कुरवंडी
अमृत रसाची भरीन मी दुरडी ...... अमृत रसाची ......जोगवा ॥४॥

आता साजणी झाले मी नि:संग
विकल्प नवऱ्याचा सोडिलेला संग
काम क्रोध हे सोडियले मांग
केला मोकळा मार्ग हा सुरंग ......केला मोकळा......जोगवा ॥५॥

ऐसा जोगवा मागुनि ठेविला
जाऊन महाद्वारी नवस म्या फेडिला
एका जनार्दनी एकच देखिला
जन्म मरणाचा फेरा मी चुकविला ......जन्ममरणाचा....जोगवा ॥६॥

## १९८८ मध्यें प्रतिष्ठानवर प.पू.श्रीमाताजींच्या उपस्थितीत ११ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर अशी नऊ दिवस नवरात्री-पूजा संपन्न झाली. पूजेच्या पाचव्या दिवशी जोगवा उत्साहांत गायला गेल्यावर श्रीमाताजींनी त्याचा अर्थ विशद करताना केलेला उपदेश

संत एकनाथ, प्रतिष्ठान म्हणजे पैठण येथे रहात होते. त्यांनी हा जोगवा लिहिला आहे. जोगवा याचा अर्थ योग. त्या काळात, खेडवळ भाषेत हा जोगवा गात आणि आज संपूर्ण महाराष्ट्रात असंख्य लोक गातात. कल्पना करा, अनेक वर्षापूर्वी हे गाणे लिहीले होते आता त्याचे सहज योगासाठी रूपांतर केले आहे. परंतु त्या काळांत लोकांना काय हवे होते, त्याचे अगदी तसे वर्णन त्यात केले आहे. आता, महाराष्ट्रात देवीला 'बया' म्हणतात. तुम्हाला आश्चर्य वाटेल, माझ्या लहानपणी माझे नाव बया होते. माझ्या कुटुंबात मला 'बया' या नावाने बोलवयाचे. ते म्हणतात, मी आईचेकडे योग मागेन;

त्याला खेड्यात जोगवा म्हणतात. बयेचा जोगवा. याचा अर्थ मी देवीकडे जोगवा मागेन. आता, अनादि निर्गुणी, - आदि व त्याचेही पूर्वीची अशी अनादि निर्गुणी, कोणतेही गुण नसलेली, अशी भवानी या पृथ्वीवर प्रगट झाली आहे व ती महिषासुराला मारण्यासाठी आली आहे, शिवाय, तीत्रिविध तापांची झाडणी करायला आली आहे. त्रिविध ताप काढून टाकण्यासाठी व आपल्या निर्वाणासाठी येणार आहे. ते म्हणाले, मी माझ्या निर्वाणी येईल तेव्हा मी काय करीन. तर द्वैत, म्हणजेत परमेश्वापासून मी स्वत:ला वेगळा समजतो- जग व परमेश्वर वेगळे आहेत असे मानणे म्हणजे द्वैत आणि आपण परमेश्वराशी एकरूप आहोत असे मानणे, हे अद्वैत.तेव्हा हे द्वैत काढून टाकून मी तिला माळ घालीन. मग हातात बोधाचा, प्रकाशित ज्ञानाचा झेंडा घेऊन, जाति-धर्माच्या भेद-भावाविरहित, तिला भेटायला जाईन. मग मी काय करीन, नऊ दिवस या देवीची नऊ प्रकारे भक्ति करीन व ज्ञानरुपी पुत्राची मागणी करीन, इतर सर्व मागणे सोडीन.

हे गीत एखाद्या स्त्रीने म्हणावे असे लिहीले आहे - आता मी दंभाचा व अहंकाराने भरलेल्या संसाररूपी पुत्राचा त्याग करीन. पूर्ण बोधाची (प्रकाशित ज्ञानाची) परडी भरीन, आशा-मनिषा, आकांक्षांच्या दरडी जमिनदोस्त करीन. मनोविकारांची(मनावर झालेले कु संस्कार) कुरवंडी करुन पृथ्वीवरून त्यांना काढून टाकीन व अमृत रसाची दुरडी भरीन.

आता साजणी, मी पूर्णपणे नि:संग (निरासक्त) झाले आहे. विकल्प (संशय)रुपी नवऱ्याची संगत मी सोडली आहे, याचा अर्थ माझ्यातील संशय नाहीसा झाला आहे. ती म्हणते, काम व क्रोध या विकारांना मी सोडून दिले आहे व माझा बोगदा, (सुषुम्ना)मोकळा केला आहे. किती सरळ व सुरेख शब्द.

असा योग मी मागितला, मला मिळाला व मी तो सांभाळून ठेवला आहे. महाद्वारी जाऊन परमेश्वराचे आभार मानले. आता मी जन्म -मरणाच्या या समस्यांमधून मुक्त झाले आहे, त्यावेळी त्यांनी हे सर्व लिहिले होते व आज तुम्ही ते पहात आहात अगदी तेच व स्पष्टपणे आणि स्त्रियांचे गाण्यात, आता आपल्याला प्रतिज्ञा करायला हव्यात, स्वत:बद्दल व दुसऱ्यांबद्दल

आपण एक महान गोष्ट लक्षात ठेवायला हवी. आता आपण योगी आहोत, तेसुध्दा सहजयोगी व सहजयोगी म्हणून आपण सर्वश्रेष्ठ असायला हवे. आपल्या वागण्याने, स्वभावाने, इतर लोकांबरोबराच्या व्यवहारात, कोणत्याही परिस्थितीत व अडचणीमधून मार्ग काढताना, आपण सर्वश्रेष्ठ असायला हव. आता तुमच्यापैकी काही अत्यंत बुध्दिमान आहेत, पण हृदयात कमी पडतात, या उलट काही अत्यंत विशाल हृदयाचे आहेत, पण बुध्दीने कमी पडतात. तेव्हा संतुलनात

यायल हवे. परंतु सर्वात श्रेष्ठ ज्ञान, सर्व श्रेठ ज्ञानामधे महान ज्ञान की परमेश्वरासारखे प्रेम करु शकत नसाल तर तुमच्यात काहीतरी फारच बिघाड आहे व तो जायला हवा.

प्रेम असायला हवं आणि ज्याला निर्वाज प्रेम म्हणतात ते हवं. म्हणजे व्याजविरहित, केवळ मुद्दल, याचा अर्थ असा की, तुम्ही एक दुसऱ्यांवर असं प्रेम करा की तुम्हाला निरपेक्षपणे देण्याची आवड हवी. फक्त देण्याची. अशा देण्याचा आनंद फारच महान आहे. माझ्या अनुभवावरुन मी तुम्हाला सांगते. साक्षात्कार (जागृती) द्यायचा असते तेव्हा मला सर्वात जास्त आनंद होतो. दुसरे म्हणजे जेव्हा मी इतरांना काही वस्तू देते तेव्हा. तिसरे म्हणजे काहीतरी देता येते हा आनंद. तेव्हा तुम्ही लोक आता घेणाऱ्यांच्या बाजूचे नसून देणाऱ्यांच्या बाजूचे असल्याने , दुसऱ्याला तुम्ही काय दिले आहे हे पहा.

या उलट तुम्ही अजूनही क्रोधी स्वभावाचे असाल, तुमच्यामध्ये हावरटपणा असेल अथवा सहजयोग्याला शोभणार नाही असं सर्व तुमच्यामध्ये असेल, तर याचा अर्थ असा की, तुम्ही काही मिळविले नाही. तुम्ही जर कपडे, खाणे-पिणे, ऐषाराम या बाबतीत फार काळजीपूर्वक असाल तर लक्षात घ्या की तुमच्यात काहीतरी कमतरता आहे. अजून तुमचे व्यक्तिमत्व पूर्ण नाही. एक वाक्य कायमचे लक्षांत ठेवा. स्वत:ला प्रश्न विचारा- जीवनात मला जे मिळवायचे होते ते मी मिळविले का?

हा एक प्रश्न तुम्ही विचारा, माझे जीवनसाध्य मी प्राप्त केले आहे का?. त्यामुळे सर्व परिस्थिती तुमच्या लक्षात येईल. कारण तुम्ही आपले स्वत:चे गुरु आहात, तुम्ही सर्व जाणता. सहजयोग तुम्ही बुध्दीने शिकला आहात. पण जेव्हा तो तुमच्यामध्ये अंतर्यामी खोलवर जातो व सर्व ज्ञान तुमच्या शरीताचा अविभक्त भाग बनतो तेव्हा फारच निराळे असते, साक्षात्कारी जीवाची संपूर्ण वृत्तिच वेगळी असते. माझेच घ्या- एखादा प्रश्न माझ्य







लक्षात आला की लगेच मी ध्यानात जाते व लगेच तो प्रश्न सुटतो. कारण ती माझी शक्ती आहे. तसेच जर एखादा प्रश्न तुमच्या लक्षात आला आणि जर तुम्ही ध्यानात गेलात तर तो प्रश्न माझ्याकडून सोडविला जाईल. म्हणजेच ध्यानात तुम्ही मला शरण जाता. मग ते काम माझे. पण जर तुम्ही आपल्या बुध्दिने अथवा बोलण्याने तो प्रश्न सोडू लागाल तर तुम्ही सापळ्यात अडकता. तेव्हा तुम्हाला एखादी अडचण आली तर तुम्ही ध्यानात जा, प्रार्थना करण्याची पण आवश्यकता नाही. फक्त ध्यानात जा. आणि त्या अडचणीतून तुम्ही यशस्वीरित्या बाहेर पडाल.

आज तुम्ही माझ्याकडे यशाची मागणी करीत होता. मला हे तुम्हाला सांगायचे आहे की ध्यानाच्या स्थितींच्या किल्ल्यात तुम्ही सुरक्षित असता, सुस्थितीत असता व ध्यानातच तुम्ही मोठे होता. अन्यथा तुम्ही मोठे होऊ शकत नाही, वृक्षाला सूर्यप्रकाश असतो तसं ते आहे. तुम्ही ध्यात निर्विचारतेत असायला हव, दुसऱ्याला विरोध करायला नको अथवा त्याच्याशी सहमत व्हायला नको, काही म्हणायला नको. विशेषत:दुसऱ्या योग्यांचे संबंधी कोणी विचित्र वागत असलेला तुम्हाला आढळला तर फक्त ध्यानात जा आणि परिस्थिती कशी बदलेल याचे तुम्हाला आश्चर्य वाटेल . ही तुमची शक्ती आहे. जगात किती लोकांना साक्षात्कार मिळाला आहे? फार थोड्या; ते मोठे होत आहेत, कार्य करीत आहेत, पण ते ध्यानाच्या शक्तिमध्ये कमी पडतात.

सर्वात उत्तम म्हणजे शरणागति आणि शरणागत होणे सर्वात सोपे आहे. फक्त तुम्ही मला हृदयात ठेवा, सतत; हा सर्वात सोपा मार्ग. मग त्या शिवाय तुम्ही राहूच शकत नाही, जगूच शकत नाही. एकदम विचित्र वाटत. हे अगदी निरासक्त प्रेम आहे. तुम्हाला अगदी, आरामदायक, आनंदी व समाधानी वाटतं. मग तुम्हाला कशाचीच गरज नसते. त्या स्थितीमधें प्रस्थापित व्हायला हव.

तुम्हाल ते सहजसाध्य आहे,कारण मी स्वत:तुमच्या बरोबर आहे. तुम्हाला सांगितल्याप्रमाणे सहजयोगात फक्त एकच अडथळा आहे की, सुरवातीला तुम्ही मला ओळखायला हवं. परंतु मला ओळखणं हे थोडस अवघड आहे. कारण मी महामाया आहे आणि त्यामुळे महामायेने निर्माण केलेल्या गोंधळात बहुतेकजण अडकतात. पण परवा मी तुम्हाला सांगितले तसे, माझ्या दुसऱ्या रुपांत तुम्ही माझ्यासमोर येऊ शकला नसता. वाघावर बसलेली, हातात तलवार घेतली आहे, अशा व्यक्तिची कल्पना करा. तुम्ही माझ्यासमोर येऊ शकला नसता म्हणून मला महामाया व्हावे लागले. कारण या रुपांत तुम्ही माझ्याजवळ येऊ शकता, माझ्याशी बोलू शकता. हव असेल तर माझा उपदेश घेऊ शकता. त्यामुळे मार्गदर्शन चांगल करता येते. सर्व काही उलगडून मी तुम्हाला स्पष्टपणे सांगते. पण तुम्ही महामायेच्या समोर बसले आहात हे लक्षात ठेवणे फारच फायद्याचे आहे. तेव्हा महामायेच्या आवरणामुळे गोंधळात पडू नका. माझ्या आदर सन्मानात, प्रोटोकॉल्स, मला समजून घेण्यात व इतर सर्व बाबतीत आपण कोणतीही चूक करीत नाही, इकडे तुम्ही लक्ष द्यायला पाहिजे. व शरणागत होण्याचा प्रयत्न करा, शरणागत व्हा..आपोआप तुम्ही सर्व शिकाल. शिकविण्यासारखे काही नाही.

ही स्थिति वृक्षासारखी आहे. जेव्हा वृक्ष पूर्णपणे बहरतो,त्यावेळी त्याला फुले येतात. मग फुले स्वत:च्या परिपक्वदशेत गेल्यावर फळे बनतात. अशा पध्दतीने तुम्ही मोठे होता. त्यावेळी स्वत:च्या मोठे होण्याचा स्वत:च अनुभव व आनंद घेत सुखाने रहाता. तेव्हा, तुम्हा सगळ्यांना सुखी व आनंदी करावं हे माझं जीवन साध्य आहे. ते मला मिळवायच आहे. म्हणून हे सर्व प्रयत्न चालू आहेत. माझे व तुमचे जीवन - साध्य मिळविता येईल अशी आशा आहे.

ईश्वराचे तुम्हाला आशीर्वाद

●●●



# वैष्णोदेवी

महालक्ष्मी, महासरस्वती व महाकालींची एकत्र स्वयंभू स्थान असलेले चैतन्यमय ठिकाण म्हणजे वैष्णोदेवी. जम्मू पासून ५२ किलोमिटर अंतरावर समुद्रसपाटीपासून २५०० फूट उंचीवर त्रिकूट पर्वताच्या पायथ्याशी हे गाव असून या गावाहूनच वैष्णोदेवीच्या यात्रेला प्रारंभ होतो. १४.५ किलोमिटर अंतरावर वैष्णोदेवीचे स्वयंभू स्थान आहे.

कटऱ्याजवळ हन्साली म्हणून गाव आहे. शेकडो वर्षापूर्वी तिथे श्रीधार नावाचे देवीचे एक परमभक्त होऊन गेले. ते नित्यनियमाने कन्यापूजन करत असत. प्रत्यक्षात म्हणजे लहान-लहान मुलींची पूजा करत. ते स्वत: अपत्यहीन होते. अनेक वर्षे त्यांची कन्यापूजा चालू होती. माता त्यांच्यावर प्रसन्न झाली व ती स्वत: लहान मुलीचे रूप घेऊन एक दिवस त्या जमलेल्या कन्यांमध्ये बसली. भक्त श्रीधरांची पूजा संपल्यावर जमलेल्या कन्या निघून गेल्या व फक्त माता देवी राहिली. तिने श्रीधरांना सांगितले, तुम्ही भंडारा करा. जवळच्या गावांतील लोकांना सांगा की उद्या दुपारी भंडारा (भोजन-प्रसाद ) आहे. श्रीधर गरीब असल्याने काहीही करू शकत नव्हते. परंतु देवीची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांनी आजूबाजूच्या गावांत निमंत्रण केले. त्याच वेळेस एका गावात साधूंचा मोठा जमाव त्यांना दिसला. त्यांचा मुख्य गोरखनाथ होता आणि त्याचा एक शिष्य भैरवनाथ व बाकीचे अनेक शिष्य होते. श्रीधरने त्यांना भंडाऱ्याची माहिती सांगितली व कन्येचा आदेश सांगितला. त्यावर गोरखनाथ म्हणाला कि, आम्हाला इन्द्रसुध्दा भोजन घालू शकला नाही तर ह्या कन्येची काय कथा! परंतु ही कोण कन्या आहे, हे पहाण्यासाठी त्यांनी भंडाऱ्याच्या आमंत्रणाचा स्वीकार केला.

दुसऱ्या दिवशी अनेक लोक जमले. त्यातच योगी गोरखनाथ व त्यांचा पट्टशिष्य भैरवनाथ आणि शेकडो शिष्य हजर झाले. श्रीधर घाबरून गेला. त्याने देवी मॉंचा धावा सुरु केला. त्याचवेळी दिव्यरुपी कन्या प्रगट







झाली व श्रीधरला म्हणाली, ऊठ, सर्वांना तुझ्या कुटीमध्ये पाचारण कर.त्याची कुटी खरोखरच लहान होती. पण देवीच्या कृपेने सर्व त्यात सामावले. गोरखनाथ, भैरवनाथ आपल्या शिष्यासह आत गेले आणि सहज बसू शकले. हा देवीचाच चमत्कार. देवीने आपल्याकडील एका दिव्य पात्रातून निर्माण झालेले भोजन सर्वांना वाढण्यास सुरवात केली. हे दृष्य बघून श्रीधर अतिशय उल्हासित झाला. परंतु बाकीचे हैराण झाले. गोरखनाथ व भैरवनाथ समजले की, ही कन्या साधारण नाही. ती कुणीतरी दिव्य-शक्ती असावी. पण ती कोण आहे याचा छडा लावावयास पाहिजे. सर्व लोक जेवून तृप्त झाले होते, कारण त्यांना इच्छाभोजन मिळाले होते.

भैरवनाथाला तरीसुध्दा तिची परिक्षा घ्यावयाची होती. त्याने कन्येला म्हटले की, तू सर्वांना त्यांच्या इच्छेनुसार भोजन दिलेस, मग मला माझ्या इच्छेनुसार मांसाहारीए भोजन दे. देवी मनातून त्याचा हेतू समजली होती. तिने त्याला सांगितले की, ही एक ब्राह्मण कुटी आहे. म्हणून तुला मांसाहारी भोजन मिळणार नाही. परंतु भैरवनाथ ऐकेना. जेव्हा कन्यारूपी माता त्याच्या पानात वाढायला आली, तेव्हा त्याने तिला पकडण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर ती अंतर्धान पावली. भैरवनाथ कुणी साधा मानव नव्हता. तो पण एक तपस्वी व योगी होता. योग सामर्थ्यावर त्याने तिचा तपास सुरू केला आणि त्याला कळले की, ती दिव्य कन्या वायुरूपाने त्रिकूट पर्वताकडे जात आहे. तरीसुध्दा त्याने त्याचा हेका सोडला नाही. तिचा शोध घेण्यासाठी ओ पण त्रिकूट पर्वताकडे निघाला. इकडे कन्यारूपी देवी, आताचे जे देवीस्थान आहे त्या परिसरात, बरेच दिवस राहिली. भैरवनाथ फिरत-फिरत तिथे येऊन पोहचला. एक दिवस त्याल गुंफा दिसली. त्यच गुंफेत देवीचे वास्तव्य होते. गुंफेच्या दरवाज्यावर देवीने पहारेकरी ठेवला होता. तो म्हणजे भक्त वीरलांगूर (वानर). त्याच्याशी भैरवनाथाने शुध्द केले व त्याला हारवून तो आत शिरण्याचा प्रयत्न करू लागला. वैष्णोदेवीने त्याला आत येण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला. परंतु ते न ऐकता तो आत शिरतच होता. शेवटी देवीने त्याचे शिर उडविले. ते जवळच्या घाटीवर जाऊन पडले व धड तिथेच राहिले.

मरतेसमयी त्याला माँ वैष्णोदेवीचा महिमा समजला व तो म्हणाला, माँ, मला क्षमा कर. मी तुला ओळखू शकलो नाही. मी पापी आहे. मला तू क्षमा न केल्यास माझी नाचक्की होईल. तो सारखा देवीची प्रार्थना करीत

होता. योग सामर्थ्यावर तो हे करु शकला. त्याचा वारंवार माँ म्हणण्याने देवीचे हृदय पाझरले. तिने त्याला क्षमा तर केलीच, पण त्याला मोक्ष प्रदान केला. देवीने प्रसन्न होऊन त्याला वर दिला की, माझे दर्शन घेतल्यावर यात्रेकरू तुझे दर्शन घेतील.तीच प्रथा सध्या अस्तित्वात आहे.

इकडे माँ अंतर्धान पावली म्हणून श्रीधर खूप व्यथित झाला. देवीने त्याला स्वप्नात दर्शन दिले व मी येथेच आहे असे सांगितले. शिवाय त्याला आपल्याबरोबर फिरवून आपल्या वास्तव्याची जागा दाखविली. दुसऱ्या दिवशी उठल्यावर श्रीधर हर्षित झाला. स्वप्नात पाहिल्याप्रमाणे त्याने डोंगरावर फिरून देवीच्या वास्तव्याची जागा शोधण्यास आरंभ केला. अनेक दिवसांच्या प्रयत्नानंतर त्याला गुंफेचा मार्ग सापडला. शेवटी त्याला प्रत्यक्ष वैष्णोदेवीच्या स्वयंभू पिंडांचे दर्शन घडले. त्याने देवीची आराधना केली. साक्षात देवीने त्याला दर्शन दिले व त्याचा उध्दार केला. देवीकृपेने त्याला चार पुत्र झाले. देवीच्या आशीर्वादाने त्याचे वंशज आजही देवीची पूजा - अर्चा करत आहेत. देवीच्या नावाचा प्रसार करण्यात त्यांचा फार मोठा वाटा आहे.

सप्तशतीमधील कथा

सप्तशतीच्या दुसऱ्या अध्यायात म्हटले आहे की, देवतांच्या तेजामधून देवीचा प्रादुर्भाव झाला. (देवी प्रकट झाली) त्या देवीचे वर्णन असे आहे की, ती कमलासनावर बसलेली, प्रसन्न मुखाची महिषासुरमर्दिनी भगवती, महालक्ष्मी आहे .तिच्या हातात अक्षमाला, फरशी, गदा, बाण, वज्र, धनुष्य. चक्र आदी आयुधे आहेत. ही आदिशक्ति आहे आणि तिचीच महाकाली, दुर्गा, सरस्वती अशी रुपे आहेत. पूर्वकाली असुर फार प्रबळ झाले होते. त्यांचा पुढारी महिषासूर होता. त्याने सर्व देवांचा पराभव केला व तो स्वत: इन्द्र झाला. तेव्हा पराभूत झालेले सर्व देव ब्रम्हदेवाकडे गेले व त्यांनी आपली स्थिती वर्णन केली. तिथेच भगवान शंकर व विष्णु बसलेले होते. महिषासुराचे वर्णन ऐकून श्रीविष्णू क्रोधित झाले. त्यांच्या मुखातून एक महान तेज प्रकट झाले. त्याप्रमाणे ब्रह्मा व इतर देवता यांच्या मुखातूनसुध्दा तेज बाहेर पडले. त्या सर्वांचे एक तेज झाले. त्या तेजाला उपमा नव्हती. त्यामधून एक नारी उत्पन्न झाली. ब्रह्मा, विष्णू, महेश व इतर देवतांची वर वर्णन केलेयी आयुधे तिला दिली. नंतर हिने असुरांशी शुध्द करून महुषासुराचा वध केला. त्यामुळे तिचे नाव महिशासूर मर्दिनी, त्याचप्रमाने ज्या ज्या वेळेस असूर अतिशय प्रबळ व उन्मत झाले, त्या त्या वेळेस महालक्ष्मी, वैष्णवी नारायणी हिने त्यांचा पाडाव केला.

वैष्णोदेवी गुफ़ेत तिन पिंडी असून महाकाली, महासरस्वती व महालक्ष्मी अशा एकत्र स्वयंभू तिन पिंडी आदिशक्ती आहे. वैष्णोदेवी च्या मंदीत अत्यंत व्हायब्रेशन आहेत. भारतातून व जगभरातून अनेकजण वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी जातात. मात्र खुद्द जम्मू शहरातील अनेक सहजयोगी आदिशक्तीच्या सगुण रुपाचे दर्शन घेण्यासाठी गणपतीपूळे सेमिनारमध्ये पुणे,दिल्ली येथे येतात. त्यांच्या म्हणण्यानुसार पुरानात आदिशक्तीने फक्त एका श्रीधर ब्रामणाला दर्शन दिले आज आदिशक्ती श्रीमाताजी निर्मलादेवी लाखो सहजयोग्यांना दर्शन देत आहे. तसेच फक्त सहजयोगीच स्वयंभू स्थानातील चैतन्य अनभवू शकतो.

तरी श्रीमाताजी निर्मलादेवींची साकार पुजेचा सहजयोग्यांनी लाभ घेत असताना पुजेच्या कामात पडेल ते काम करुन हातभार लावला पाहिजे

● ● ●



## दिवाळी पूजा,

१९ ऑक्टोबर, १९८९

लक्ष्मीतत्त्वामधे प्रस्थापित होऊन महालक्ष्मी तत्त्व अंगी बाणण्याकडे लक्ष द्या.

दिवाळी पूजेचे कारण म्हणजे देवांचा आनंद जाणून घेणे. दिवाळी १००० वर्षापूर्वी जेव्हा श्रीरामांचा राज्याभिषेक त्या दिवशी झाला तेव्हा साजरी केली गेली. म्हणजे मानवतेच्या हिताचे त्या दिवशी राज्यारोहण झाले. सॉक्रेटीसने वर्णन केल्याप्रमाणे तो हितकारी राजा होता. हितकारी राजाचे राज्यारोहण झाले ही आनंदाची गोष्ट होती. जेव्हा लोक प्रजेच्या हिताशिवाय दुसऱ्या कशाचाही त्याला विचार नाही असा राजा शोधून काढतात तेव्हाच फक्त ही गोष्ट शक्य होते. तेव्हा आपण या निर्णयाप्रत येतो की माणसाला सहजयोगी बनले पाहिजे.

आपल्याकडे दोन प्रकारचे सिध्दांत आहेत. एक म्हणजे (कॅपिटॅलिझम)भांडवलशाही व (कम्युनिझम) साम्यवादी. पहिली पैशावर आधारीत व दुसरी आज्ञाधारकतेवर. जी सहज योगासाठी चांगली आहे. आज्ञाधारकपणा इतका महान आहे की त्यांच्या हितासाठी त्यांना काही सांगा ते लगेच तसे करतात. ते इतके सूज्ञ आणि गहन झाले आहेत. उलट दुसरीकडे आपण व्यक्तिगत स्वातंत्र्यात हरवलो आहोत. भांडवलशाहीच्या देशांत हित संपुष्टात आले आहे. जेव्हा  तुम्हाला वेड्यासारखे धावत सुटण्याचे स्वातंत्र्य असते, त्यावेळी तुम्ही  स्वत:चा विनाश करून घेता. उदा. लोक कुठल्याही प्रकारच्या विचित्र फॅशनविषयी वेडे झाले आहेत. या कल्पना उधोजकांपासून येतात. ज्यांना तुमचा पुरा फायदा घ्यायचा असतो. हित हे सर्वोच्च आहे. आपण खरोखर स्वतंत्र लोक असलो तर आपल्यासाठी जे हितदायी आहे ते आपण स्वीकरले पाहिजे.

दुसऱ्या दिवशी नरकासूर हा राक्षस देवाने मारला होता. आता दुष्ट लोक बक्षिसे घेत आहेत. हा विपर्यास कशासाठी? दुष्ट कृत्यत आनंद उपभोगणाऱ्या आपल्यामधील दुष्ट प्रवृत्तिंचा नाश केला पाहिजे. आपल्याला अपले प्रश्न ओळखले पाहिजेत. जेव्हा तुम्ही स्वत: पाहाता तेव्हा हृदय उघडे होते. तुमचे हृदय उघडल्याशिवाय तुम्ही स्वत:चा आनंद उपभोगू शकत नाही. तुम्ही तुमचे हृदय उघडा. सर्व बंधने अटी निघून जातील. प्रत्येक लहन गोष्टीमध्ये आनंदाचा तरंग आहे. तुमची जातपात, एकत्र होऊ शकली नाही तर तुमच्यामध्ये काहीतरी चुकते आहे.

या दिवशी लक्ष्मी देवतेची पूजा केली जाते. तिला गर्व नसतो, ती इतरांवर दबाव घालत नाही. मानव प्राणी या उलट असतो. ज्यांच्याकडे पैसे असेल ते घोड्यावरून जातात. ती मात्र पाण्यामधून बाहेर येते. कमळावर विश्रांती घेते आणि स्वत:चे वजन शोषून घेते. आपल्याला आपली स्थिती, पैसा, शिक्षण, वगैरे सर्वांचे वजन शोषून घेतले पाहिजे. ह्या सर्व निरर्थक गोष्टीए तुम्हाला जड व्यक्ति करून खाली ओढत असतात. ती संतुलनात उभी असते. तिच्या गुरुत्वाकर्षणाच्या मध्ये इतक्या व्यवस्थित असते. त्याप्रकारे  तुम्हालाही संतुलनात राहिले पाहिजे. तुम्हाल पृथ्वी मातेवर

उभारले पाहिजे म्हणजे लहानशी गोष्ट झाली तरी तुम्ही संतुलनात येऊ शकता. तिच्या दोन हातात गुलाबी कमळे असतात. गुलाबी रंग तिच्या उब,अगत्य, प्रेमळपणाचा स्वभाव दाखविते. ऊब म्हणजे हॅस्पिटल नव्हे किंवा घाणेरडे घार नव्हे तर आगत्यपूर्वक, उबदार सोयीचे. श्रीमंत माणसाकडे दहा कुत्री असतात, आत कोणी येऊ शकत नाही. उंदीरसुध्दा. काहीही जास्त नको, दिमाख नको, चढाई नको पण इतरांना आनंद व सोय देईल असे एखाद्या गोष्टीचे कौतूक व्हावे आणि यजमानाने म्हणावे इतक्या थोडक्यात त्याने केले, ही अतिथीला आनंद द्यावा असे वाटणाऱ्या व्यक्तीची खूण आहे. हे किती महान असे सांगणे म्हणजे चढून जाणे आहे.

तुम्ही सर्वांचा आनंद उपभोगीला पाहिजे नाहीतर तुम्ही सहजयोगी नाही. कलावंतांना उत्तेजन दिले पाहिजे. कोणीतरी म्हणेल हा प्रामाणिकपणा नाही. कमळ चिखलाच्या तळ्यात उगवते, पण तुम्हाला चिखल दिसला नाही. पूर्ण तळे कमळ सुवास व सौंदर्याने भरते. तिथे प्रामाणिकपणा असतो. सहजयोगी म्हणून तुमचे काम काय आहे हे प्रामाणिकपणे समजण्यात प्रामाणिकपणा आहे.तुमच्या प्रेमाने तुम्ही प्रथेकाला उत्तेजन देत असता. तुमच्या प्रेमाने प्रत्येकाला विश्वास निर्माण करीएत सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे स्वत:शी प्रामाणिक रहा. प्रथम तुमच्या मनाने समजाऊन द्या. दुसऱ्याला लागेल असे बोलणाअर असाल तर थांबणे बरे. दुसऱ्यांना खुष करणाऱ्या गोष्टी तुम्ही म्हणाल तर तुम्हाला खुष करणाऱ्या गोष्टी तुमच्याकडे येतात. काही लोक असे असतात जे कधीच हसत नाहीत. त्यांना गुदगुल्या करणे तुम्हाला माफ आहे. तुम्हाला मुलांसारखे बनले पाहिजे. लक्ष्मीतत्त्वाचे एक तत्त्व आनंदी रहाणे हे आहे.

दुसऱ्या हाताने लक्ष्मी येते. पैसेवाल्या लोकांनी ज्यांना गरज आहे त्यांना पैसे द्यावे पण अशा तऱ्हेने की कोणाला कळू नहे. गुपचुप, एका हालाला दुसऱ्या हाताने दिले आहे हे समजता कामा नये. व्यक्तिची गरज काय आहे हे पहायला पाहिजे. योग्य जागी आणि योग्य वेळी देण्याची गरज आहे. ते खळबळजनक नको. त्याने हृदय भरून आले पाहिजे. अध्यात्मिक वाढीसाठी तुम्ही जे द्याल ते उत्तम. उदा. मला फूल पुरे आहे कारण मी निग्रही आहे.

दुसऱ्या हाताने लक्ष्मी रक्षण करते. हा हात सर्व सहजयोग्यांना रक्षणकर्ता आहे. मी नेहमी सहजयोग्यांसाठी उभी राहीन कारण तिथे आत्मा हजर आहे. सर्व कलावंत, कला, काव्य. साहित्य, प्रामाणिक राजकारणी लोक, सरळमार्गी सरकारी नोकर आणि ज्यांना रक्षणाची जरूर आहे त्या सर्वांचे रक्षण करीन. पण जे खराब आहे त्याला आधार देता कामा नये. दुसऱ्यांच्या चांगुलपणाचे रक्षन केले पाहिजे. ते सहजयोगी नसले तरी हरकत नाही. त्यांच्या चांगल्या गुणांचे रक्षण केले पाहिजे. तुम्ही अक्षय, चिरंतन, जगाचे संरक्षक आहात. तुम्ही क्रूर होता कामा नये. जेव्हा सासू सूनेचे भांडन पहातो तेव्हा आपण म्हणतो किती भांडकुदळे आहे. तरी पण आपण तेच करतो. आपण तलवारी नाही, कमळे आहोत. कोणाला मारायचे असेल तर कमळ वापरा. कमळाने कसे मारायचे हे समजायला सहजयोगामध्ये खूप गहनतेत उतरले पाहिजे.

एकदा लक्ष्मीने तुम्हाला आश्रय दिला की तुम्ही महालक्ष्मीमध्ये वाढता. मग तुम्ही जगाच्या हिताचा विचार करता. त्यांना आत्मसाक्षात्कार कसा द्यायचा हे पहावे. तुमचा दृष्टिकोन बदलतो. आपण प्रश्न सोडविण्यासाठी इथे आहोत. जग हा आपला प्रश्न आहे. आपल्याला जबाबदाऱ्या घेतल्या पाहिजेत. तुम्ही आर्किटेक्ट असाल तर काहितरी महान निर्माण करा. संगीततज्ञ असाल तर चांगले संगीत तयार करा. सरकारी नोकर असाल तर चांगले काम करा. मी तुम्हाला मदत करेन. प्रत्येकाचे व्यक्तिमत्व वाढते आहे. जर सुषुम्नेच्या मध्य मार्गावर रहाल तर कोणीही तुम्हाला हात लावू शकणार नाही. दुसऱ्यातल्या चुका तुम्हाला काढायच्या नाहित. मग तुम्ही सहजयोगी नाही. लिडरनी सुध्दा इतरांना ताब्यात ठेवण्याचा प्रयत्न करु नये. सर्व ब्रम्हचैतन्य हे शांत तत्त्व आहे हे सर्व काही करते. तुम्हाला सर्व काही स्वीकारण्यासाठी , तसेच तुमच्या प्रगतीसाठी कैलासाची उंची गाठण्यासाठी शांत राहिले पाहिजे.

ईश्वर तुम्हाला आशिर्वाद देवो. ● ● ●

# वनदेवी आयुर्वेदिक हेल्थ प्रॉडक्टस प्रा.लिमीटेड

वनदेवी कंपनी मार्फत तयार होणारी औषधे व हेल्थ प्रॉडक्ट एक विशिष्ठ उद्देशाने परम चैतन्याच्या मार्गदर्शनात व आशीर्वादात तयार केली जातात. मागिल अनेक वर्षापासून सदर चैतन्यमय औषधांचा वापर करणाऱ्यांना मोठ्याप्रमाणावर लाभ झाला आहे. संपुर्ण भारतातील सहजयोग्यांना व नागरिकांपर्यंत लाभ होण्याच्या दृष्टीने सर्वत्र वितरण त्वरित करण्यासाठी कंपनीने आकर्षक स्किम तयार केली आहे.

कंपनीचे अधिकृत विक्रेते होण्यासाठी आपल्याला आपली सर्व माहिती, त्यामध्ये आपले शिक्षण, व्यवसायाची माहिती, आर्थिक माहिती, ओळखणाऱ्या व्यक्तीचे प्रमाणपत्र असावे. तसेच जर आपले जनरल स्टोरर्स अथवा औषधाचे दुकान असेल तर प्राधान्य देण्यात येईल.

तरी आपली सर्व माहिती (बायो डेटा) त्वरित खालील पत्यावर पाठवावा. आपली नियुक्ती कंपनीचे अधिकृत वितरक/विक्रेता म्हणून करण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कंपनीने स्वत:कडे राखून ठेवला आहे.

तसेच प.पू.श्रीमाताजींच्या आशीर्वादात वनदेवीने अनेक नवीन उत्पादने तयार केली असून ती नुकतील बाजारात उपलब्ध झाली आहेत. वनदेवीच्या सर्व उत्पादनाना श्री माताजींचे प्रत्यक्ष आशीर्वाद असल्याने त्याचा वापर करणाऱ्यांना अश्चर्यकारक फायदे झाले आहेत. वनदेवीकडे उपलब्ध असलेल्या उत्पादनाची यादी पुढीलप्रमाणे आहे.

| Sr.No. | NAME OF PRODUCTS | INDICATIONS |
|---|---|---|
| 1 | AVIPATTIKAR VATI TABLETS | Hyperacidity |
| 2 | PEPCID TABLETS | Chronic & Amoebic Dysentry, Diarrhoea |
| 3 | VANEXEL TABLETS | Insomina, Mental Stress, Hypertension & Depression. |
| 4 | OMCID TABLETS | Hyperacidity, Stomatitis, Peptic Ulcer |
| 5 | BRAINOVTT TABLETS | Boosts Brain Functions,Mental Tonic |
| 6 | RELAXID TABLETS | Chronic Constipation |
| 7 | GUDUCHI TABLETS | Immunity Booster |
| 8 | COLDAGESIC TABLETS | Fever, Sinusitis, Headache, Body Pains |
| 9 | DEVIZYME TABLETS | Enzyme & Gastric Disorders |
| 10 | CYCLOR TABLETS | Mensutural Cycle Regulator |
| 11 | NIMAIM PLUS | Rhumatic & Arthritis pain with fever |
| 12 | VANCARDI TABLETS | Cardiac Disorders & for LBP & HBP |
| 13 | WINZOLE TABLETS | All types of warms |
| 14 | VANSKIN TABLETS | Skin Disorders & Blood Purifier |
| 15 | TRIFLA CHURNA | Constipation |
| 16 | GUDMAR TABLETS | Diabetes Mellitus |

| Sr.No. | NAME OF PRODUCTS | INDICATIONS |
|---|---|---|
| 17 | CHANDRAPRABHAVATI TABLETS | Diabetes, Kidney Stone |
| 18 | SITOPALADI CHURNA | Cough, Asthma |
| 19 | KUMARIASAV NO 1 SYRUP | Cough, Laryngitis,Loss of apetite, Liver & Ab dominal Disorder |
| 20 | ASHOKARISHTA | Debility, Cough Stomach Disease, Loss of Apetite, Acidity, White Discharge |
| 21 | ASHWAGANDHARISHTA | General Debility, Health Tonic as Rasayan, Loss of sleep, Vigour & Vatality. |
| 22 | CHANDANASAV | Diuretic, Useful in burning,Mixuration, Acidity & Piles |
| 23 | DRAKSHASAV | Anorexia (loss of apetite)Indigetion, Keeps body fit & general Tonic |
| 24 | PUNARNAVARISHTA | Liver disorder, Liver tonic |
| 25 | DASHMULARISHTA | Debility, Cough, Asthma, Loss of Apetite, Acidity White Discharge |
| 26 | USHRISAV | Deuretic, Burning, Mensuration, Acidity,Piles |
| 27 | SARASWATARISHTA | Loss of sleep, General Nervine Tonic, Good for Health & Mind |
| 28 | MAHAMANJISHTADI KADHA | Blood purifier & useful in All types of Skin dease, White Discharge |
| 29 | MAHARASNADI KADHA | Rheumatic Aliments, Bodyache, Muscular Pain |
| 30 | PATHYADI KHADA | Chronic Headeache, Migraine |
| 31 | DEVICORDIAL SYRUP | Female Fuctional Corrective Anti Infective & Restorative Tonic |
| 32 | DEVIZYME SYRUP | A Well Digestant, A Powerful Appetiser, Nutritive & Restorative,Demuicent & Diuretic |
| 33 | DEVITONE SYRUP | Digestive Appetiser & General Tonic (for all) |
| 34 | DEVIDROP SYRUP | The Delicious Tonic with Iron, Calcium, for General Wickness,Teething problem Anorexia, Retarded growth, Gastritis. |
| 35 | DEVILIV SYRUP | Jaundice, Hepatitis, Dyspepsia, Hepatic Disorders, Malnutrition, Syndrome |
| 36 | DEVILIV DS SYRUP | Jaundice, Hepatitis, Dyspepsia, Hepatic Disorders, Malnutrition, Syndrome |
| 37 | DEVILIV DS CAPSULE | Jaundice, Hepatitis, Dyspepsia, Hepatic Disorders, Malnutrition, Syndrome |

| Sr.No. | NAME OF PRODUCTS | INDICATIONS |
|---|---|---|
| 38 | LEUCOMA SYRUP | More effective in Functional Gynecological, Mensural Disorder |
| 39 | IROVAN SYRUP | Iron Deficiency, Anemias during pregnency & lactation after surgery, Chronic blood loss due to Bleeding piles,hookworm |
| 40 | IROVAN CAPSULE | Iron Deficiency, Anemias during pregnency & lactation after surgery, Chronic blood loss due to Bleeding piles,hookworm |
| 41 | POWERVTI CAPSULE | Vigour & Vitality in Male & Female |
| 42 | DIAVAN CAPSULE | Diabetes Melitus |
| 43 | ENERVTT CAPSULE | General Tonic for all Ages |
| 44 | VAN-KEFX SYRUP | Expectorant, Bronchodilator, Dismulecent, Re-lease irritation of Bronchitis & Irritable condition of lower respiratory Tract, Useful in any type of common Caugh & cold complaints. |
| 45 | CLODINE OINTMENT | Providone-iodine Ointment U.S.5 % w/w Effec-tive against Bacteria, Fungus,Protozoa, yeasts & virus. |
| 46 | LASID OINTMENT | Silver sulphadiazine cream USP, Protector of cuts, wounds and burnt skin |
| 47 | FENACIN GEL | Diclofenic, sodium gel, for quick relief from swelling pain & inflamation,lowback pain, joint pain, sprains & strains, muscular pain. |
| 48 | ULTRA - BEAM | Spray for body pain, effective for muscular/ joint/rhumatic pain backache, sciatica, cramp, sprain, Lum bago etc. |
| 49 | TRIFLA TABLET | Constipation, Blood purifier |
| 50 | HINGVASHTAK TABLETS | Dyspepsia, Flutulance |
| 51 | PANCHASKER TABLET | Constipation, mild Laxative |
| 52 | SITOPALADI TABLET | Cough, Asthma |
| 53 | UBTTAN POWER | Herbal Treatment for healthy skin |
| 54 | MEHENDI POWDER | It promotes healhy hair growth & give condition & cooline effect. |
| 55 | GULKAND PRAVALYUKTA | Restories Transcnlity Mind, Zyes & keep cool of whole body from Heat. |
| 56 | CHAVANPRASH | General weakness, Appetier, Tuberculesis |

| Sr.No. | NAME OF PRODUCTS | INDICATIONS |
| --- | --- | --- |
| 57 | KARNA SHOOLHAR TAIL | Useful in earache, Tinnitus |
| 58 | KARMA STRAVAHER TAIL (SUS) | Useful in Otorrhoea, Earache,Tinnutis |
| 59 | NIRMAL JEEVAN CREAM | Piles, fissures, disorders of bowels burning sensation of urine, soles and eyes, unsound sleep, cracked heels, chaped hands, skin problems |
| 60 | NIRMAL VAPORUB | Very useful and effective in cold and headache. |
| 61 | NIRMAL LINIMENTUM | Useful in body ache, joints pain, mornig stiffness arthritic pain. rhuematic pain |
| 62 | NIRMAL MORNING GLORY OIL | A mild and nourishing oil specially formulated to tones up body and skin |
| 63 | NIRMAL BODY COOLENT CAPSULE | Very effective in eye burning, hot liver, burning in urinary channeles, tooth ache & piles. |
| 64 | AMLA HAIR OIL | Making hair clean soft and silky |
| 65 | VANADEVE PROTOVIT POWDER | General weakness, energy& stamina, useful for all age group |

म` वनदेवी आयुवैदिक हेल्थ प्रॉडक्टस प्रा. लिमीटेड
प्लॉट क्रमांक ८, चंद्रगुप्त हाऊसिंग सोसायटी,कोथरुड, पौड रोड, पुणे ४११ ०२९
दुरध्वनी क्रमांक :- ०२० २५२८ ६७२२ (M) 94220 31268
ई- मेल vanadeviayur@rediffmail.com वेब साईट www.vandeviayur.com

## सहजयोगी कलाकारांनी घडविला " साई चमत्कार "

गुरु पोर्णिमा निमित्ताने ४ जुलै २००४ रोजी कोपरगांव मधिल सहजयोगी कलाकारांनी श्रध्दा आणि सबुरी ची शिकवण देणाऱ्या साईबाबांच्या जीवनावर आधारित " साई चमत्कार "नावाची नाटिका शिर्डी येथे साईनाथ विद्यालयात सादर केली होती. सदर कार्यक्रमास अहमदनगर, नाशिक जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर सहजयोगी उपस्थितीत होते.

प.पू. श्रीमाताजींचा आशीर्वाद असल्याने सदर नाटिका अत्यंत प्रभावी व ऱ्हदयस्पशी सादर झाली.त्यातील साईबाबांची भूमिका श्री बी.आर.पोटभरे यांनी साकारली तसेच श्री विनायाक जाधव, भक्त अब्दुल्ला, लक्ष्मी व झिपरी यांची भुमिका अनुक्रमे आशालता कुलकर्णी व पूजा दुसाने यांनी साकरली होती. अन्य भुमिकांमध्ये गिरीष देशपांडे, सचिन अहिरे, मोरे, दिपाली जाधव यांनी अत्यंत उत्कृष्ठ काम करुन सर्वांची वाहवा मिळवीली.

सदर कलाकारांचा सत्कार प्रा. अशोक चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी अनेक ज्येष्ठ सहजयोगी उपस्थित होते. त्यावेळी गुरुपूजेचे महत्व विषद करताना त्यांनी सदर नाटिकेचे प्रयोग इतर ठिकाणी सहजयोगाचा प्रसार करण्याच्या कार्यक्रमापूर्वी ठेवण्याबाबत आवाहन केले.

## सर्व सहजयोगी बंधू व भगिनींचे सहकार्याबद्दल आभार

प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींच्या कृपेत ''निर्मल इंन्फोसिस्टीम अँण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणें'' या श्रीमाताजींच्या कंपनीमार्फत चैतन्य लहरी ( मराठी) द्वै मासिक (एकुण सहा अंक ) प्रकाशित केले जात आहेत. सदर निघणाऱ्या अंकामध्ये प्रामुख्याने श्रीमाताजींची पूजा प्रसंगाची भाषणे व प्रवचने, तसेच सहजयोग्यांसाठी इतर आवश्यक माहिती याचा प्रामुख्याने सहभाग असतो. तसेच श्रीमाताजींचे दुर्मिळ फोटो प्रसिध्द केले जातात.

या पुर्वीच्या चारही अंकाचे वितरण सभासदांना हातपोच/पोष्टाने झालेले असून हा पाचवा अंक देखिल हातपोच/ पोष्टाने वितरीत केला जात आहे. आपल्याला या वर्षाचा शेवटचा सहावा अंक (अंक क्र.११/१२) पुण्यात होणाऱ्या 'ख्रिसमस पूजेत ' प्रत्यक्ष हातात देण्याची व्यवस्था केली आहे.तसेच जे सभासद सदर पुजेसाठी उपलब्ध असणार नाहीत त्यांनी आपला नोंदणी क्रमांक व नाव पुजेला येणाऱ्या सहजयोग्यांकडे पाठविल्यास त्यांच्या हस्ते अंक देण्यात येईल. या शिवाय जर आपला अंक आपणास हातपोच देणे शक्य झाले नाही तर आपणास माहे जाने.२००५ मध्ये पोष्टाने निच्छितपणे पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

तसेच पुढील वर्षासाठी म्हणजे जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ साठी पोष्टाने अंक उपलब्ध करुन मिळण्यासाठी आपली देणगी पोष्ठाने रुपये २२५/-(रु.दोनशे पंचवीस फक्त) व हात पोच अंकासाठी रुपये २००/- ख्रिसमस पुजेमध्ये स्विकारण्याची व्यवस्था केली आहे. तरी आपण व आपले सहजयोगी सहकारी यांची नोंदणी ख्रिसमस पूजेमध्ये करावी. तसेच गेल्यावर्षाप्रमाणेच एका केंद्रावर एकदम सर्वांचे अंक पाठविण्याची व्यवस्था चालू ठेवलेली आहे.

आपले नम्र
चैतन्य लहरी (मराठी) मंडळ
निर्मल इंन्फोसिस्टीम अँण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणे

सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, दिनांक १६ एप्रिल २००४ पासून सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटों, कॅलेंडर, चैतन्य लहरी व युवादृष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इंन्फोसिस्टीम अँण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणें'' या कंपनी मार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इंन्फोसिस्टीमस अँण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करु नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील. तसेच चैतन्य लहरी मासिकाचे नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठवावा. सदर कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. BEHIND HOTEL GRACE,
PAUD ROAD, KOTHRUD,PUNE 411 O29. TEL. 020 25286537 , 020 25285232

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥







